जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट दिनांक - २२/११/२०२४**

## विधानसभा निवडणूक -२०२४
## मतमोजणी बाबत

पुणे पोलीस आयुक्तालयातील एकूण ०८ विधानसभा मतदार संघाची मतमोजणी मुख्य स्ट्रॉंगरुम एफ.सी.आय गोडाऊन, कोरेगाव पार्क, पुणे याठिकाणी दि.२३/११/२०२४ रोजी होणार असून त्याकरीता मुख्य स्ट्रॉंगरुम एफ.सी.आय़ गोडाऊन व पोलीस आयुक्तालयाचे हद्दीमध्ये पेट्रोलिंग, पोलीस स्टेशन राखीव, झोन व अतिरिक्त झोन पेट्रोलिंग वाहतुक नियंत्रण बंदोबस्त, उमेदवारांचे निवासस्थान व पक्ष कार्यालय बंदोबस्त, संवेदनशील व अतिसंवेदनशील ठिकाणांचा बंदोबस्त,नियंत्रण कक्ष राखीव,आर.सी.पी. क्यु.आर.टी, आपत्कालीन बंदोबस्त तसेच पोलीस आयुक्त, पोलीस सह आयुक्त, अपर पोलीस आयुक्त, पोलीस उप आयुक्त व सहा.पोलीस आयुक्त यांचे सोबत पेट्रोलिंग फोर्स व राखीव याप्रमाणे बंदोबस्त लावण्यात आलेला आहे. विधानसभा निवडणुक मतमोजणी बंदोबस्ताकरीता एकुण ४ अपर पोलीस आयुक्त, ११ पोलीस उप आयुक्त, १९ सहा.पोलीस आयुक्त, ३५० पोलीस अधिकारी २५०० पोलीस अंमलदार, केंद्रीय सशस्त्र पोलीस बलाच्या १२ कंपन्या आणि राज्य राखीव पोलीस बलाच्या ०२ कंपन्या असा बंदोबस्त लावण्यात आलेला आहे.

प्रतिबंधात्मक आदेश- मा.पोलीस सह आयुक्त, पुणे शहर यांचे दि.१९/११/२०२४ चे प्रतिबंधात्मक आदेशान्वये मुख्य़ स्ट्रॉंगरुम एफ.सी.आय गोडाऊन, कोरेगाव पार्क, पुणे येथे २०० मीटर परीसरात परवानगीशिवाय इलेक्ट्रॉनिक उपकरणे/ज्वलनशील पदार्थ घेवून जाणे, हत्यार बाळगणे व घेवून जाणे, फोटोग्राफी/व्हिडीओग्राफी करणे, वाहणे आत नेणे व पासशिवाय प्रवेश कर्ण्यास मनाई करण्यात आलेली आहे. तसेच ०५ किंवा ०५ पेक्षा अधिक लोकांना एकत्र येवून बेकायदेशीर जमाव जमविण्यास मनाई करण्यात आली आहे.

वाहतुक नियोजन- दि.२३/११/२०२४ रोजी भारतीय खाद्य निगम (एफ.सी.आय़ गोडाऊन) कोरेगाव पार्क, येथील मतमोजणी केंद्रासमोरील साऊथ मेन रोडवर पुर्वेस लेन नं-५ जंक्शन, पश्चिमेस लेन नं-०२ जंक्शन पर्यंत तसेच लेन नं-०३ व लेन नं-०४ वर २०० मीटर पर्यंत सर्व प्रकारच्या वाहनांना नो पार्कींग झोन कर्ण्यात येत आहे.

१) डॉन बॉक्सो युवा केंद्रापासून पुणे साऊथ मेन रोड दि.२२/११/२०२४ रोजी साऊथ मेन रोड २२.०० वाजलेपासुन ते मतमोजणी प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत वाहतुकीसाठी बंद कऱण्यात येत आहे.

२) सेंट मीरा कॉलेज व अतुरपार्क सोसायटी कडून साऊथ मेन रोडकडे येणाऱ्या वाहनांना लेन नं-१ पुणे प्रवेश बंद कऱण्यात येत आहे.

३) लेन नं-५, ६ व ७ कडून साऊथ मेन रोड व येणाऱ्या वाहनांना लेन नं-४ पुढे प्रवेश बंद राहील. सदर वाहनांनी उजवीकडे वळण घेवून इच्छित स्थळी जावे

४) लेन नं-०२ वर प्लॉट नं - ३८ जैन प्रॉपर्टी येथे व लेन नं-०३ वर बंगला नं-६७ व ६८ येथे साऊथ मेन रोडवर येणाऱ्या वाहनांना प्रवेश बंद कऱण्यात येत आहे.

**जनसंपर्क अधिकारी**
**पुणे शहर पोलीस**